# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड** **D.C.R. दिनांक : १७/०५/२०१२**

## (१) <u>शासकीय कामात अडथळा केला :-</u>

यातील नमुद **फिर्यादी त्रिवेणी रंगनाथ गुट्टे, वय ४० वर्षे, धंदा नोकरी- एस. टी. बस वाहक, बस क्रमांक एम. एच. २६ डीएल ३३९, लातुर आगार** ही दिनाक १७/०५/२०१२ चे १२.०० व. चे सुमारास, लोहा येथील बस स्थानकातुन आपली एस. टी. बस बाहेर काढीत असतांना, यातील **आरोपी बबलु मारोतराव शिंदे, राहणार नांदेड** हा भज्जे घेण्यास गेला असता, भज्जे घेऊन एस. टी. बसमध्ये चढुन फिर्यादीस **"तुझ्या बापाच्या घरची बस आहे काय ? बस का थांबवली नाही ? "** असे म्हणुन फिर्यादीस तीचे गालावर थापड मारुन जीवे मारण्याची धमकी दिली व शासकीय कामात अडथळा केला वगैरे दिलेल्या फिर्यादवरुन पो. स्टे. लोहा गुरनं ४०/२०१२ कलम ३५३, ३३२, ३२३, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२१७ सावंत** हे करीत आहेत.

## (२) <u>आकस्मात मृत्यू :-</u>

**(अ)** यातील नमुद **४५ वर्षे वय असलेले एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत** हे दिनांक १७/०५/२०१२ चे ०३.१५ वा. चे सुमारास उमरी ते मौ. शिवनगांव येथील रेल्वे ट्रॅकवरील मौ. सेलगाव शिवार येथील रेल्वे पटरीवर रेल्वेने कटुन, मृत अवस्थेत मिळुन आला वगैरे **भिमराव हिरामन साळवे, वय ५६ वर्षे, धंदा नौकरी-स्टेशन मास्तर, रेल्वे स्टेशन उमरी** यांनी दिलेल्या खबरीवरुन पो. स्टे. उमरी आकस्मात मृत्यु नंबर ०६/२०१२ कलम १७४ सिआर. पि. सी. प्रमाणे आ. मृ. दाखल असून **तपास पोहेकॉ/३७४ गुरुपवार** हे करीत आहेत.

## (3) <u>बेकायदेशीररित्या दारु बाळगुन मिळून आला :</u>

**(अ)** यातील नमुद **आरोपी अशोक पिराजी पिल्लेवाड, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी, राहणार मौ. बोरगांव (कोल्हे), ता. बिलोली** हा दिनांक १७/०५/२०१२ रोजी ०९.३० वा. चे सुमारास मौ. बोरगांव (कोल्हे) येथील रहाते घरी विनापरवाना, बेकायदेशीररित्या देशी दारु भिंगरी संत्रा १८० एम. एल. चे ४८ बॉटल **किंमती १,९२०/- रु.** ची जादा दराने विक्री करण्याचे उद्देश्याने बाळगुन मिळुन आला वगैरे **पोहेकॉ/१२२३ माधव मण्णाजी वाडेकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पो. स्टे. रामतिर्थ गुरनं ०४/२०१२ कलम ६५ (ई) मुं.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२२३ वाडेकर** हे करीत आहेत.

**(ब)** यातील नमुद **आरोपी पिराजी जळबाजी माणिकवाड, राहणार मौ. डोनगांव, ता. बिलोली** हा दिनांक १७/०५/२०१२ रोजी ११.०० वा. चे सुमारास मौ. मौ. डोनगांव येथील रहाते घरी विनापरवाना, बेकायदेशीररित्या देशी दारु भिंगरी संत्रा १८० एम. एल. चे १२ बॉटल किंमती ९८०/- रु., देशी दारु भिंगरी संत्रा ७५० एम. एल. चे ०३ बॉटल किंमती ४५०/- रु., खजुरा बिअर ६५० एम. एल. चे २० बॉटल किंमती २,२००/- रु. असा **एकुण ३,६३०/- रु.** चे मालाची जादा दराने विक्री करण्याचे उद्देश्याने ५,०००/- रु. किंमतीचे व्हिडीओकॉन कंपनीचे फ्रिजसह बाळगुन मिळुन आला वगैरे **पोहेकॉ/१४४३ अशोक माणिकराव इंगळे** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पो. स्टे. रामतिर्थ गुरनं ०५/२०१२ कलम ६५ (ई) मुं.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१४४३ इंगळे** हे करीत आहेत.

## (४) <u>निष्काळजीपणाने वाहन चालऊन, धडक देऊन मरणास कारणीभुत झाला :-</u>

यातील नमुद **अज्ञात वाहन चालक आरोपीताने** दिनांक १६/०५/२०१२ चे २२.३० वा. चे सुमारास, वाजेगाव शिवार येथील बायपास रोडवर आपले ताब्यातील वाहन हे हयगईने, निष्काळजीपणाने व भरधाव वेगात चालऊन, यातील **मयत शेख युनुस शेख खाजा, वय ३० वर्षे, धंदा मजुरी, राहणार मौ. वाजेगाव, ता. जि. नांदेड** हा बायपास रोडने पायी जात असतांना त्यास जोराची धडक देऊन गंभीर जखमी केल्याने तो जागीच मरण पावला. तरी त्याचे मरणास सदर अज्ञात वाहन चालक आरोपी हा कारणीभुत झाला वगैरे **फिर्यादी शेख पाशा शेख खाजा, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, राहणार मौ. वाजेगाव, ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पो. स्टे. नांदेड ग्रामीण गुरनं १६८/२०१२ कलम २७९, ३०४ (अ) भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पाहेकॉ/२७३ होणराव** हे करीत आहेत.

This document was created using Smart PDF Converter. To remove this message purchase the product at www.smartpdfconverter.com